**विशेष दिवाणी दावा क्र. ११६/२०१६ मधील निशाणी ११३ वरील आदेश.**

(निलेश गांधी वि. मे. अरिहंत डेव्हलपर्स वगैरे)

(CNR No. MHSN020007562016)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ४ यांनी त्यांचेविरुध्दचा विनाकैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. प्रस्तुतचा दावा वादी यांनी रक्कम वसुल होऊन मिळण्याकरीता व मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी हे सरकारी कंत्राटदार असुन त्यांना कामानिमीत्त संपुर्ण जिल्हा व जिल्हयाबाहेर ज्या ठिकाणी काम चालु आहे तेथे जावे लागते. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांना वकीलांना भेटुन आवश्यक ती कागदपत्रे देता आलेली नाहीत. परिणामी त्यांच्याविरुध्द विनाकैफियत आदेश पारीत करण्यात आलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत रेकॉर्डवर घेतल्यास प्रस्तुतच्या दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदतच होणार आहे. या व इतर कारणांवरुन प्रतिवादी क्रमांक ४ यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी क्रमांक ११४ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. वादींच्या कथनांप्रमाणे अर्जातील सर्व कथने खोटी व खोडसाळपणाची आहेत. प्रतिवादी यांनी हेतुपुरस्पर दावा मिळकत विक्री करण्याकरीता न्यायालयाचा मनाई आदेश असतानाही, प्रतिवादी क्रमांक २ यांच्याबरोबर दावा विषय तडजोडीने मिटविण्यासाठी प्रतिवादी क्रमांक ४ हे खरेदीपुर्वी

वाटाघाटीसाठी वादींचे नातेवाईक वल्लभदास शेठजी यांच्याकडे आले होते. प्रतिवादी क्रमांक ४ यांना सर्व वस्तुस्थितीची कल्पना असुनही प्रतिवादी क्रमांक ४ यांनी न्यायालयाचा आदेश न जुमानता दावा मिळकत खरेदी केली व दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याकरीता जाणीवपुर्वक कैफियत दिलेली नाही. इतकेच नव्हे तर, प्रस्तुत प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याकरीता सुमारे २०० दिवसांचा विलंब झालेला असुन सदर विलंबाचे प्रत्येक दिवसाचे योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्जात नमुद कारण संयुक्तीक नसल्यामुळे प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा रक्कम वसुल होऊन मिळण्याकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी अर्जात नमुद कारणाकरीता कोणतेही कागदोपत्री पुरावे दाखल केलेले नसले तरी, दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे गरजेचे वाटते. प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेतल्यास प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालून वादी–प्रतिवादी मधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल.

५. प्रस्तुत प्रतिवादी यांना निश्चितच कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणून कैफीयत नाकारणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे कैफियत दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही परिणामी त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. असे असताना, कैफियत

दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी यांचेवर खर्च बसवून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: **आदेश** ::

१. अर्ज नि.११३ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी यांनी वादींना रक्कम रु.१०००/- द्यावेत.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2024.11.29 15:43:11 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. २२/११/२०२४ २रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.